# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र.
०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र - ३२/२०२६ दिनांक- १३/०२/२०२६

**प्रेस नोट**

**बँकेत वयोवृध्द इसमास फसवणूक करणाऱ्या आरोपीतास अटक करुन मुद्देमाल हस्तगत करण्यात बोळींज पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.**

-----------------------

दिनांक ०८/०१/२०२६ रोजी एस.बी.आय.बँक, विरार पश्चिम येथे फिर्यादीशी फॉर्म भरण्याचे बहाण्याने ओळख करुन दिनांक ०९/०१/२०२६ दुपारच्या सुमारास यांनी फिर्यादीस विश्वासात घेवुन एय.बी.आय.बँकेतील खाते क्र. ३५६२१६६५९१६ मधील शिल्लक असलेली रक्कम ही मोड बॅलन्स अकाउन्टमध्ये ट्रान्सफर करुन देतो असे सांगुन फिर्यादी यांची दिशाभुल करुन त्यांना त्यांचे बॅक खात्यातुन २,००,०००/- रुपये काढण्यास लावुन ती रोख रक्कम फिर्यादी यांचे मोड बॅलन्स अकाउन्टमध्ये जमा न करता स्वत:चे फायदयाकरीता घेवुन जाऊन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन बोळींज पोलीस ठाणेस गु.र.क्र. I १३/२०२६, भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३१६(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

बोळींज पोलीस ठाणे हद्दीत चोरीचे प्रमाण वाढू लागल्याने त्याचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळ आरोपीत हा साई शरण डॉरमेटरी एसी बेड, पत्ता - साईकुंज बिल्डींग, नायगाव क्रॉसरोड, दादर पूर्व येथे तात्पुरता राहण्यास होता. परंतू तो तेथून निघून गेला होता. सदर डॉरमेटरी मधील आरोपीत याची माहीती घेऊन त्याचा मोबाईल नंबर तपासता तो चुकीचा असल्याचे समजले. घटनास्थळवर व विविध ठिकाणी कौशल्यपुर्ण तपास करुन आरोपीत हा मुळ रा. भोपाळ येथील राहण्यास असल्याची माहिती प्राप्त करुन असून त्याचे लोकेशन तपासता, आरोपीत हा एका ठिकाणी न थांबता तो लखनऊ, दिल्ली असे फिरत असतांना निष्पन्न झाले. आरोपीत हा एका ठिकाणी राहत नसतांना पोलीस पथकाने आरोपीताचा माग काढत असतांना दिनांक २६/०१/२०२६ रोजी आरोपीत मुंबई येथे आल्याचे समजले. सायबर गुन्हयांत तपासाचे कौशल्य असलेले पोउनिन/किरण वंजारी यांनी सदर गुन्हयाचा तांत्रिक तपास करुन आरोपीत नामे **ब्रिजकुमार संतोषकुमार वाधवानी, वय ६२ वर्षे, रा.हाऊस नंबर ४/५७, छत्रसाल नगर, जे.के.रोड, हुजूर, भोपाळ, मध्यप्रदेश, पिनकोड ४६२ ०२२, सध्या फिरस्ता यास दादर, मुंबई** यास अटक करुन त्याचेकडे केलेल्या तपासात २५,५००/- रुपये किंमतीचा मोबाईल जप्त करुन तसेच गुन्हयातील रक्कम आरोपीताचे अकाऊंट मधून १,५१,२८७/- रुपये लिनमार्क करुन एकूण १,७६,७८७/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

आरोपीत याचेकडे केलेल्या पोउनि/किरण वंजारी व त्यांच्या पोलीस टिमने कौशल्यपूर्ण तपास करुन **मालाड पोलीस ठाणे, मुंबई येथील गुन्हा रजि.नंबर ०८/२०२६, भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३१८(४) प्रमाणे** हा गुन्हा उघडकीस आणला आहे.

गुन्हयाचे तपासात आरोपीत हा सराईत गुन्हेगार असून त्याचेवर खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) गाडगे नगर पोलीस ठाणे, अमरावती गुरनं ५३५/२०२१५, भादंविसंक ४२० प्रमाणे.

२) बाजारपेठ पोस्टे, भुसावळ, गुरनं १७३/२०१५, भादंविसंक ४२०,४०६,४६७,४६८,४७१ प्रमाणे.

३) बाजारपेठ पोलीस ठाणे, भुसावळ, गुरनं २०३/२०१५, भादंविसंक ४२० प्रमाणे.

४) सिटी कोटवाली पोलीस ठाणे, अमरावती गुरनं २०७/२०१५, भादंविसंक ४२०, ४०६ प्रमाणे.

५) वर्धा पोलीस ठाणे गुरनं १६१/२०१५, भादंविसंक ४०६ प्रमाणे.

६) रावपुरा पोलीस ठाणे, वडोदरा गुजरात गुरनं १०३/२०१६, भादंविसंक ४२०, ४०६ प्रमाणे.

७) गोंदीया सिटी पोलीस ठाणे, गुरनं २०१/२०१५, भादंविसंक ४२०, ४६८, ४७१ प्रमाणे.

सदरची कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा.श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, मा. श्री. सुनिल जायभाये, सहा. पोलीस आयुक्त नालासोपारा यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रकाश कावळे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, बोळींज पोलीस ठाणे, पो.उपनिरी./किरण वंजारी, पो.उपनिरी./विष्णू वाघमोडे, श्रेणी पो.उपनिरी./जनार्दन मते, सफौ/ किशोर धनु, पो.हवा./रोशन पुरकर, पो.हवा./ प्रफुल सरगर, पो.अं./संदीप शेळके, यांनी केलेली आहे.

------------ooooooo----------------